**प्रेसनोट दि.१२/०४/२०१९**

**हरविलेल्या मुलीस तिच्या वडीलांचा शोध घेवुन त्यांचे ताब्यात दिलेबाबतची उल्लेखनिय कामगीरी बाबत.**

**भारती विद्यापीठ पोलीस ठाणे, पुणे शहर**

दि.०६/०४/२०१९ रोजी भारती विद्यापीठ पोलीस ठाणे हद्दीतील कात्रज पोलीस चौकी अंमलदार सपोनि.चिवडशेट्टी, पोउनि.लाड तसेच चौकीचे पोलीस कर्मचाऱ्यासह पेट्रोलिंग करत असताना कात्रज येथील पीएमपीएमएल बस स्टॉप जवळ एक १५ वर्षाची मुलगी संशईतरित्या फिरताना मिळुन आली. तीस कात्रज पोलीस चौकीस बोलाऊन, विश्वासात घेऊन तिच्याकडे चौकशी करता,एक अल्पवयीन मुलगी,वय-१५ वर्षे, धंदा-शिक्षण,रा.घारगांव,आंबी, काळेवाडी फाटा,पुणे येथील असल्याचे समजले. तसेच मुलीकडे अधिक चौकशी करता,तिचे आई-वडील रागवल्यामुळे ती दि.०६/०४/२०१९ रोजी घरातुन निघुन आल्याचे सांगितले.

त्यावरुन नमुद मुलीचे नातेवाईकांना संपर्क साधला असता,नमुद मुलीचे वडील व चुलते रात्रौ २१.४५ वाजता पोलीस चौकीस समक्ष हजर झाले. त्यांना त्यांच्या मुलीबाबतची तिचे वडील व चुलत्या बाबत खात्री करुन त्यास त्यांचे ताब्यात दिले.

सदर कामगीरीबाबत मुलगी सुखरुप मिळाल्याने तिच्या वडीलांना आनंदाश्रु आवरता आले नाही. तसेच त्यांनी मुलगी मिळाल्याचे समाधान व्यक्त करुन पोलिसांचे आभार मानलेले आहे.

(विष्णु शं.पवार)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
भारती विद्यापीठ पोलीस ठाणे, पुणे


(अंकीत)
कात्रज पोलीस चौकी
कात्रज पी.एम.टी. बस स्टॉप जवळ,कात्रज पुणे - ४६